## उत्तरदायित्त्व कोणाचे?

असरचा अहवाल आला की दरवर्षी 'शिक्षणाच्या दशेबद्दल' शिक्षणक्षेत्रातील आणि राजकीय क्षेत्रातील सर्वांनी गळा काढायची एक प्रथा गेली काही वर्षे प्रचलित आहे आणि दिवसेंदिवस त्याला राजमान्यता मिळत आहे. 'शिक्षण हक्क कायद्यातील सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या तरतुदीमुळे परीक्षा नाहीत आणि त्यामुळे मुलांच्या संपादणुकीत घसरण होत आहे' अशी विधाने प्रथम संस्थेतर्फे करण्यात येत आहेत. शिक्षणातील खासगीकरण वाढत आहे हे मान्य करून माननीय मानव संसाधन विकास मंत्री श्री. एम. पल्लम राजू यांनी म्हटले आहे, "या नव्या दिशेबद्दल मला खेद नाही, आपल्या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे, ते खासगी शाळांमध्ये मिळाले तरी हरकत नाही". असरच्या अहवालाला प्रमाण मानले जात आहे आणि त्या अहवालानेही न मांडलेले निष्कर्ष बेधडकपणे मांडले जात आहेत ह्या दोन्हीही गोष्टी तितक्याच दुर्दैवी आहेत.

असरचा अहवाल काय सांगतोय? खासगी शाळांमधील विद्यार्थीसंख्या वाढली आहे. आणि संपादणुक पातळी घसरलेली आहे. महाराष्ट्रातील शासकीय शाळांमधील भागाकार येणाऱ्या मुलांची संख्या गेल्या 2 वर्षांमध्ये 12 टक्क्यांनी घटली आहे तर याच काळात खासगी शाळांमधील भागाकार येणाऱ्या मुलांची संख्या 28 टक्क्यांनी घटली आहे. म्हणजे खासगी शाळांमधील या बाबतीतल्या घसरणीचा दर जास्त आहे. गुणवत्ता घसरण्याचे खासगीकरण हे मुख्य कारण आहे असा निष्कर्ष यावरून काढता येईल काय? भागाकार करता येणाऱ्या मुलांची संख्या आंध्र प्रदेश आणि केरळमधील शासकीय शाळांमध्ये खासगी शाळांपेक्षा जास्त आहे. शासकीय शाळांमध्ये गुणवत्ता जास्त असू शकते असा निष्कर्ष यावरून काढता येईल काय? मग नेमके कोणते निष्कर्ष काढायचे? असरचा डाटा असा आहे की त्याचे निरनिराळे भाग पाहून त्यावरून हवे ते निष्कर्ष काढता येतील. (याची सविस्तर चर्चा वेगळ्या लेखात करता येईल). त्यामुळे असरवरून कोणते निष्कर्ष निघतात हा महत्त्वाचा मुद्दाच नाही.

असरचा अहवाल खरोखरच विसंबनीय आहे का, तो कितपत उपयोगी आहे हा खरा मुद्दा आहे. असरच्या आकड्यांप्रमाणे महाराष्ट्र, छत्तिसगड यासारख्या राज्यांमध्ये सलग 3 वर्षे मुलांची क्षमता वाढत गेलेली किंवा समान पातळीवर राहिलेली दिसते आणि त्यानंतरची दोन वर्षे ती अचानक घसरलेली दिसते. 'मुलांना नापास न करण्याचे शिक्षण हक्क कायद्यातील धोरण या घसरणीला कारणीभूत असावे' असे विधान प्रथमच्या उषा राणे यांनी केले आहे. परंतु आकड्यांमधल्या घसरणीचे कारण असरच्या मूल्यमापन घेण्याच्या पद्धतीतही असू शकते. याबाबतची तपासणी झालेली आहे काय? दुसरीचा धडा वाचू शकणाऱ्या तिसरीतल्या मुलांची संख्या गेल्या दोन वर्षांत 8 टक्क्यांनी वाढली. तर तोच धडा वाचू शकणाऱ्या पाचवीतल्या मुलांची संख्या त्याच दोन वर्षांत 15 टक्क्यांनी घटली असे महाराष्ट्राचे आकडे सांगतात. या तज्ज्ञांचा अंदाज खरा असेल तर काही क्षमतांच्या आकड्यांमध्ये वाढ कशी काय दिसते? प्रत्यक्ष वर्गांमध्ये खरोखरच असे उलटसुलट बदल झाले आहेत काय? की 2011 आणि 2012 साली ज्या स्वयंसेवकांनी ही पाहणी केली त्यांच्या प्रशिक्षणात काही कमतरता होती? एखाद्या राज्याची रँडम सँपल पद्धतीने पाहणी करण्यासाठी जितक्या मुलांची परीक्षा घ्यायला हवी त्यापेक्षा कितीतरी जास्त मुलांची परीक्षा असर घेते. पण त्यामुळेच अनौपचारिक क्षेत्रातील अनेक स्वयंसेवकांना ही चाचणी घेण्यासाठी सहभागी केले जाते. अनौपचारिक क्षेत्राचा सहभाग जितका जास्त तितकी त्यांच्या काटेकोर प्रशिक्षणाची गरज जास्त. आकड्यांची विश्वासार्हता ही निश्चितच या स्वयंसेवकांच्या प्रशिक्षणावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहणार. ही प्रशिक्षणे कॅस्केड पद्धतीने झालेली आहेत असे असरच्या वेबसाइटवर नमूद केलेले आहे. प्रशिक्षणांची कॅस्केड पद्धती कोठेही यशस्वी झालेली नाही हे जगजाहीर सत्य आहे, सर्व राज्यांचा तो अनुभवही आहे आणि व्यवस्थेनेही हे मान्य केलेले आहे. स्वयंसेवकांच्या या प्रशिक्षणांचे आउटकम काय, ते आउटकम किती विश्वासार्ह आहेत, याची बारकाईने तपासणी करणे गरजेचे आहे. असरच्या 2007 पासूनच्या अहवालांमधील आकडे आपण जितके बारकाईने पाहू तितका हा प्रश्न जास्त प्रकर्षाने समोर येतो.

असरचा अहवाल फारसा उपयोगी नसण्याचे हे केवळ एक कारण झाले. आणखी काही मूलभूत कारणांसाठी खरे तर या अहवालाबाबतच प्रश्न विचारण्याची गरज आहे.

शिक्षण हक्क कायद्याने प्रत्येक बालकाला त्याच्या जास्तीतजास्त क्षमतांपर्यंत सर्वांगीण विकासाची व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी दिलेली आहे. असरचे मूल्यमापन अत्यंत मर्यादित आणि शिक्षण हक्क कायद्याच्या मूलभूत विचारसरणीशी विसंगत असे आहे. त्यामुळे असरच्या अहवालावरून काहीच निष्कर्ष (कोणाच्याच सोयीचे/गैरसोयीचे) काढता येणार नाहीत.

शिक्षण हक्क कायद्याशी सुसंगत असे मूल्यमापन कसे असले पाहिजे हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे, परंतु तो या लेखाचा विषय नाही. असे मूल्यमापन तयार करण्याचे व अमलात आणण्याचे काम शिक्षण हक्क कायद्याने नेमलेल्या अकेडमिक ऑथॉरिटींनी (एन.सी.इ.आर.टी. आणि एस.सी.इ.आर.टी.) केले पाहिजे. हे अजून झालेले नाही ही एक मोठी त्रुटी आहे. पुढच्या वर्षी जर महाराष्ट्रातल्या सर्व शिक्षकांनी संख्यावाचन, वजाबाकी व अंकातला भागाकार करून घ्यायचे ठरविले, तर असरच्या निकालात सुधारणा दाखविणे सहज शक्य आहे. परंतु बालकांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेत त्यामुळे फारसा काही फरक पडणार नाही.

अशा साक्षरतेच्या परीक्षांना गुणवत्ता मानून शिक्षकांना शिक्षा किंवा बक्षीस देण्याची तरतूद बाराव्या पंचवार्षिक योजनेत आहे. या योजनेच्या शिक्षणविषयक शिल्पकारांनी शिक्षण हक्क कायदा आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 यांचा नीट अभ्यास करण्याची गरज आहे असे दिसते. स्थानिक तसेच जगभरच्या अनुभवांमधूनही धोरणकर्त्यांनी शिकले पाहिजे. आंतरराष्ट्रीय अनुभव पाहिले तर काय दिसते? बालकांच्या साक्षरतेच्या परीक्षा घ्यायच्या आणि त्या निकालाची जबाबदारी पूर्णतः शिक्षकांवर टाकायची या दिशेने अमेरिकेसह इतर अनेक देश गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न करीत आले आहेत. त्यांच्या प्रयत्नांना यश तर आलेलेच नाही, उलट अनेक नवे प्रश्न त्यातून निर्माण झाले आहेत. यांचा अभ्यास महाराष्ट्राच्या धोरणकर्त्यांनी केलेला आहे काय? गुणवत्तेचे यशस्वी मार्ग कोणते हे त्यांनी पाहिले आहे काय? बाह्य मूल्यमापने मर्यादित करणे, शिक्षकांचे व्यावसायिक कौशल्य वाढविणे, त्यांच्यासाठी शैक्षणिक मदतीच्या व्यवस्था निर्माण करणे, सर्व स्तरांवर विश्वासावर आधारलेली व्यवस्था निर्माण करणे, शिक्षकी पेशाला मानाचे स्थान देणे अशा मार्गाने सातत्याने प्रयत्न करीत गुणवत्ता सुधारण्याचे काम फिनलंडसारख्या देशाने केलेले आहे. अशा जागतिक अनुभवांचा अभ्यास करून आपली धोरणे ठरविण्याची आज गरज आहे.

खरं तर, गुणवत्तेचे मार्ग शोधण्यासाठी आपल्याला परदेशात जाण्याचीही गरज नाही. भारतातच गुणवत्तेचे अनेक यशस्वी प्रयोग व्यापक स्तरावरही झालेले आहेत. या अनुभवांचं सार राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 तयार करताना विचारात घेतलेले आहे. ‘हा केंद्रशासनाचा आराखडा आहे’ असे म्हणून केंद्र-राज्य राजकारण करायचे आणि त्यात गुणवत्तेचा बळी द्यायचा हे चित्र महाराष्ट्रातील किमान डोळस शासनकर्ते तरी बदलतील काय? प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देण्यासाठी बांधील असलेल्या व्यवस्थेतील सर्व स्तरांवरील घटकांची ताकद वाढविणे, त्यांच्या मदतीने शासकीय व्यवस्था सक्षम व बळकट करणे हे खरे आव्हान आहे. परंतु महाराष्ट्राचे दुर्दैव असे, की शिक्षण हक्क कायदा लागू होऊन तीन वर्षे झाली, तरीही महाराष्ट्राकडे याचा रोडमॅप नाही. ही जबाबदारी कोणाची आहे? “असरच्या अहवालाचा संपूर्ण अभ्यास करून आम्ही मुख्यमंत्र्यांबरोबर तज्ज्ञांची बैठक घेणार आहोत आणि योग्य ती पावले उचलणार आहोत” अशी आश्वासने टी. व्ही. वर देताना, ‘थिंक टॅंक’ बनवण्याच्या घोषणा आपण दोन वर्षांपूर्वी केल्या होत्या याचा आपल्या शिक्षणमंत्र्यांना विसर पडलेला दिसतो. विधानसभेत गुणवत्ताविषयक प्रश्नांना उत्तरे देताना आपल्या मुख्यमंत्र्यांनीही महाराष्ट्राच्या शिक्षणासाठी कोअर ग्रुप स्थापन करण्याच्या घोषणा केलेल्या होत्या. खरं तर नव्याने कार्ययोजना आखण्याचीही गरज नाही. शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यानंतर सर्व शिक्षा अभियानाचे ‘कार्यक्रम’ हे स्वरुप बदलून त्याला शिक्षण हक्काच्या अंमलबजावणीचे वाहन केले गेले. त्यानंतर सर्व शिक्षा अभियानानेच देशभरात अभ्यास करून शिक्षण

हक्क कायद्याच्या अंमलबजावणीचा आराखडा तयार केलेला आहे. शिक्षण विभाग, सर्व शिक्षा अभियान व इतर शैक्षणिक संस्थांचे एकसूत्रीकरण हा प्राधान्याचा मुद्दा असल्याचे यात नमूद केलेले आहे. महाराष्ट्रात मात्र या आराखड्यानुसार किंवा इतर कोणत्याही दीर्घकालीन योजनेनुसार काहीही करण्याचे टाळले जात आहे. या टाळाटाळीत शिक्षणमंत्री आणि धोरणकर्ते सारेच सामील आहेत. एकसूत्रीकरण करणे तर सोडाच, परंतु एकमेकांचे उणेदुणे काढण्यातच या संस्थांमधील तज्ज्ञ (काही अपवाद वगळता) धन्यता मानीत आहेत. महाराष्ट्रासमोर असलेला खरा प्रश्न हा आहे. प्रत्येक बालकापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवण्याची बांधिलकी मानून एका निश्चित रोडमॅपनुसार टप्प्याटप्प्याने सुधारणा करीत जाण्याची, धरसोड न करता नेटाने व सातत्याने काम करण्याची गरज आहे.

कोणत्या दिशेने जायचे हे ठरविण्याचा अधिकार आपल्या लोकशाही व्यवस्थेने राज्यकर्त्यांना जरूर दिलेला आहे. परंतु धोरणात्मक निर्णय घेत असताना देशाचे दूरगामी हित, वैज्ञानिक दृष्टीकोण, पद्धतशीर अभ्यास आणि सारासार विवेक वापरला जाणे शिक्षणक्षेत्रासाठी अत्यावश्यक आहे. नाहीतर पुढच्या अनेक पिढ्यांचे नुकसान होत राहील. बालकांचे असे नुकसान करणे (किंवा होऊ देणे) आता घटनाबाह्य व बेकायदेशीर आहे.

डॉ. विवेक मॉटेरो, गीता महाशब्दे